आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र– संध्याकाळी ७  वाजता

२५ नोव्हेंबर २०२२ – शुक्रवार

**ठळक बातम्या**

- भारताचा इतिहास म्हणजे गुलामगिरीची कहाणी नसून शौर्य, त्याग आणि निर्भयतेची गाथा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- सातारा जिल्ह्यात पाचशे एकर क्षेत्रात कृषी उद्योग उभारण्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची घोषण

- केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री जोतिरादित्य शिंदे यांचा कागल इथं युवा मतदारांशी थेट संवाद

- केन्द्र सरकारकडून महाराष्ट्राला दोन हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त थकीत जीएसटी भरपाई जारी

**आणि**

- ऑकलंड इथं झालेल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलंडचा भारतावर ७ गडी राखून विजय

<><><><><><>

भारताचा इतिहास म्हणजे गुलामगिरीची कहाणी नसून शौर्य, त्याग आणि निर्भयतेची गाथा आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. आसाममधले अहोम सेनापती लचित बारफुकन यांच्या ४०० व्या जयंती महोत्सवाचा सांगता समारंभ दिल्लीत झाला, त्यावेळी ते बोलत होते. चुकीच्या पद्धतीनं लिहिलेला इतिहास पुन्हा नव्यानं लिहायची गरज त्यांनी अधोरेखित केली. ब्रिटिश काळानंतर झालेल्या चुका आता सुधारल्या जात आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

लचित बारफुकन यांनी आपल्याला देशभक्तीची शिकवण दिल्याचं ते म्हणाले. तलवारीच्या जोरावर भारताचा शाश्वत वारसा मिटवू पाहणाऱ्यांना कडक उत्तर देणं भारताला चांगलंच जमतं, असा इशारा त्यांनी यावेळी दिला.

लचित बारफुकन हे मूर्तिमंत शौर्याचं प्रतीक आहे, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. ईशान्य भारताच्या विकासासाठी प्रधानमंत्री मोदी सतत प्रयत्नशील असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या शेतमालाला चांगला भाव मिळावा यासाठी सातारा जिल्ह्यात पाचशे एकर क्षेत्रात कृषी उद्योग उभारण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ते आज कराड इथं, राज्याचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कृषी प्रदर्शनाचं उद्घाटन केल्यानंतर बोलत होते.

यशवंतराव चव्हाण यांची नाळ शेतकरी आणि कष्टकऱ्यांबरोबर जोडलेली होती. त्यांच्याच विचारावर राज्य शासन काम करत आहे, असं ते म्हणाले. पारंपरिक शेतीला अत्याधुनिक शेतीची जोड देत शेतकरी सेंद्रीय शेतीकडेही वळत आहेत. या शेतकऱ्यांना अतिवृष्टीचा मोठा फटका बसला आहे. एन.डी.आर.एफ. च्या निकषात बदल करुन शेतकऱ्यांना 4 हजार 750 कोटी रुपयांच्या मदतीचं वाटप केलं, तसंच नियमित कृषी कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यावर 50 हजाराची मदतही दिली, असं त्यांनी सांगितलं. सातारा जिल्ह्यात विविध पिकांचं संशोधन होण्यासाठी बहुउद्देशीय कृषी संशोधन केंद्र उभारणीसाठी 10 कोटी रूपयांची तरतूद केल्याची माहितीही त्यांनी दिली. कराड विमानतळाच्या विकासासाठी हे विमानतळ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतर करण्यात येईल, अशी घोषणा मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली

कराड इथल्या ५ मजली नवीन प्रशासकीय इमारतीचं लोकार्पण आज त्यांच्या हस्ते झालं. कराड इथं छत्रपती संभाजी महाराज स्मारकाचं भूमिपूजनही मुख्यमंत्र्यांनी केलं. यावेळी राज्य उत्पादन शुल्क मंत्री तथा पालकमंत्री शंभूराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान आमदार पृथ्वीराज चव्हाण, आमदार महेश शिंदे, आदी उपस्थित होते.

<><><><><>

केंद्रीय नागरी हवाई वाहतूकमंत्री जोतिरादित्य शिंदे यांनी आज कागल येथे युवा मतदारांची भेट घेऊन थेट संवाद साधला. त्यांच्या अपेक्षा जाणून घेण्याचा प्रयत्न केला. आठ वर्षांपूर्वी जगात भारतीय अर्थव्यवस्था ११ व्या क्रमांका वर होती. आठ वर्षांत भारतीय अर्थव्यवस्था जगात ५ व्या क्रमांका वर आणण्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांना यश आलं आहे. २०३० पर्यंत आपण जपान आणि जर्मनीला मागे टाकून तिसऱ्या क्रमांकावर येण्याचे ध्येय ठेवलं आहे. लोकशाहीत विकास आणि प्रगतीचा मार्ग प्रशस्त आणि सर्वसमावेशक झाला, तर देशाची प्रगती लवकर होते असंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांचा आज ३९वा स्मृतिदिन आहे. त्यानिमित्त त्यांना देशभरात अभिवादन केलं जात आहे. राज्यातही विविध उपक्रमाद्वारे त्यांना आदरांजली वाहण्यात आली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कराड इथल्या प्रीतिसंगमावर असलेल्या त्यांच्या स्मृतिस्थळावर पुष्पचक्र वाहून श्रद्धांजली अर्पण केली. यशवंतराव चव्हाण यांनी शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, सहकार, सिंचन, आरोग्य अशा अनेक क्षेत्रात महाराष्ट्राच्या विकासाचा भक्कम पाया रचला, अशा शब्दांत विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी चव्हाण यांना अभिवादन केलं आहे.

'मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालया'त चव्हाण यांच्या साहित्याचं प्रदर्शन आयोजित केलं आहे. त्यात यशवंतराव चव्हाण यांनी लिहिलेली आणि त्यांच्यावर लिहिलेली अशी शंभर उत्तम निवडक पुस्तकं आहेत.

<><><><><><>

नागपूर इथं डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मैदानात एक आंतरराष्ट्रीय दर्जाचं कृषी कन्वेंशन केंद्र स्थापन केलं जाणार आहे . यासाठी 150 कोटी रुपयांचा प्रस्ताव केंद्रीय कृषी मंत्रालयाकडे पाठवला असल्याची माहिती केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांनी दिली. ते आज डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठाच्या मैदानावर आयोजित 13 व्या ऍग्रो व्हिजन कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन समारोहात बोलत होते. या कन्वेंशन केंद्राला आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचं आश्वासन केंद्रीय कृषीमंत्री नरेंद्रसिंह तोमर यांनी दिल्याचं गडकरी यांनी सांगितलं. चार दिवस चालणाऱ्या या कृषी प्रदर्शनात ऊस शेती , विदर्भात मत्स्य व्यवसायाचा विकास , बांबू उत्पादनातून संधी , विदर्भाचा दुग्ध विकास या मुख्य परिषदांसह विविध विषयांवर विस्तृत कार्यशाळा होणार आहेत, असंही ते म्हणाले.

अ‍ॅग्रोव्हिजन कृषी क्षेत्रासाठी दिशादर्शक आहे. मध्यप्रदेश सरकारनं मागील अनेक वर्षांपासून परंपरागत शेती टाळून अ‍ॅग्रो व्हिजन‘धील सूचनांचा, तसेच नवीन तंत्राचा वापर करून शेती समृद्धीच्या स्तरावर नेऊन ठेवली आहे. हे सर्व अ‍ॅग्रो व्हिजनच्या मार्गदर्शकतेचं तेच फलित आहे, असं यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले ‘मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री शिवराजसिंग चौहान यांनी म्हटलं. यंदाच्या प्रदर्शनाची संकल्पना 'अन्न, चारा आणि इंधन ' - भविष्यातील शेती ' अशी आहे.

<><><><><><>

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडीत असलेली मुंबईतली महत्त्वाची स्थळे आणि बौद्ध लेण्यांवर आधारित टूर सर्किटचं उद्या

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. संविधान दिनानिमित्तानं पर्यटन संचालनालयाननं हा उपक्रम हाती घेतला आहे. चेंबूरच्या दि फाईन आर्टस् सोसायटी इथे सायंकाळी 5 वाजता होणाऱ्या या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती पर्यटन मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.”

या सफरीमध्ये चैत्यभूमी, राजगृह, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, बीआयटी चाळ आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, वडाळा या स्थळांचा समावेश आहे. मुंबईनंतर कोकण, पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद इथंही हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

<><><><><><>

विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्यांतील मतदारांच्या नावांमध्ये तसेच राहत्या पत्त्यामध्ये दुरूस्ती करण्याकरता तातडीनं मोहीम राबवावी, असे निर्देश राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान आणि मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव श्रीकांत देशपांडे यांनी काल संबंधितांना दिले. विधानसभा मतदारसंघाच्या मतदार याद्यांवरून प्रभागनिहाय मतदार याद्या तयार करताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासंदर्भात मदान यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्त यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. देशपांडे, राज्य निवडणूक आयोगाचे सचिव किरण कुरुंदकर यावेळी उपस्थित होते. त्यांतर्गत 8 डिसेंबर 2022 पर्यंत दावे आणि हरकती स्विकारल्या जाणार आहेत.

<><><><><><>

केन्द्र सरकारनं, यावर्षी एप्रिल ते जून या काळातल्या थकीत जीएसटी भरपाई पोटी १७ हजार कोटी रुपये आज राज्य आणि केन्द्रशासित प्रदेशांना जारी केले. महाराष्ट्र, कर्नाटक, उत्तर प्रदेश आणि तामिळनाडूला मोठी भरपाई मिळाली आहे.

यापैकी महाराष्ट्राला दोन हजार कोटींपेक्षा अधिक तर दिल्ली आणि उत्तर प्रदेशला एक हजार दोनशे कोटी, तामिळनाडूला एक हजार नऊशे कोटी आणि कर्नाटकला सुमारे बारा हजार कोटी रुपये मिळाले आहेत. आत्तापर्यंत २०२२-२३ या वर्षात जीएसटी भरपाईपोटी एकूण, एक लाख पंधरा हजार कोटी रुपये जारी झाले आहेत.

<><><><><>

भारत आणि न्यूझीलंड यांच्यात ऑकलंड इथं आज झालेल्या मालिकेतल्या पहिल्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात न्यूझीलडनं भारताचा ७ गडी राखून सहज पराभव केला आणि ३ सामन्यांच्या मालिकेत १- ० अशी आघाडी घेतली आहे. विजयासाठी ३०७ धावांचं लक्ष्य घेऊन मैदानात उतरलेल्या न्यूझीलंडनं ४८ व्या षटकातच लक्ष्य पूर्ण केलं. त्यांची ३ बाद ३०९ अशी धावसंख्या झाली. टाॅम लॅथमनं न्यूझीलंडसाठी १०४ चेंडूत १४५ धावांची खेळी केली. तो नाबाद राहिला. त्यालाच सामनावीराचा सन्मान मिळाला. केन विल्यमसननं ९४ धावा करून त्याला सुरेख साथ दिली.

तत्पूर्वी भारतानं ५० षटकात ७ गडी बाद ३०६ धावा केल्या. श्रेयस अय्यरनं ७६ चेंडूत ८० धावा केल्या. शिखर धवननं ७२, शुभमन गिलनं ५० धावा करून भारताच्या धावसंख्येला आकार दिला. पुढचा एकदिवसीय सामना येत्या रविवारी हॅमिल्टन इथं होणार आहे.

<><><><><>

पत्राचाळ आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात सहभागी असल्याचा ठपका असलेले शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांचा जामीन रद्द करण्यासाठी ईडी, अर्थात सक्तवसुली संचलनालयानं याचिका दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी घ्यायला मुंबई उच्च न्यायालयानं नकार दिला आहे.

गोरेगावच्या पत्रा चाळ कथित घोटाळ्याप्रकरणी ईडीनं संजय राऊत यांना अटक केली होती. सुमारे तीन महिने अटकेत असणाऱ्या राऊत यांना ९ डिसेंबर रोजी पीएमएलए न्यायालयानं जामीन मंजूर केला. या जामिनाला स्थगिती मिळावी, यासाठी ईडीनं तात्काळ मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. परंतु, उच्च न्यायालयानं याप्रकरणी तातडीची सुनावणी घेण्याची मागणी फेटाळून लावली होती. त्यानंतर ईडीनं आपल्या याचिकेत काही सुधारणा करत पुन्हा एकदा उच्च न्यायालयात धाव घेतली. मात्र आज न्यायमूर्ती एम.एस. कर्णिक यांच्या खंडपीठानं त्यावर सुनावणी घ्यायला नकार दिला.

<><><><><>

ज्येष्ठ अभिनेता अमिताभ बच्चन यांच्या परवानगीशिवाय त्यांचं नाव, फोटो, आवाज किंवा इतर व्यक्तिविशेष इतर कोणाला वापरता येणार नाही. या संदर्भात बच्चन यांनी दाखल केलेल्या याचिकेवरच्या सुनावणी दरम्यान दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती नवीन चावला यांनी हा अंतरिम आदेश दिला. ऑनलाईन लॉटरी, टी शर्ट यासारख्या उत्पादनांसाठी बच्चन यांचा आवाज किंवा फोटो त्यांच्या अनुमतीशिवाय वापरले जात आहेत, असं त्यांचे वकील हरीश साळवे यांनी न्यायालयात सांगितलं. बऱ्याचशा वेबसाइटची डोमेनही अमिताभ बच्चन यांच्या नावे नोंदवण्यात आल्याचं ते म्हणाले. न्यायालयानं टेलिफोन ऑपरेटर्सनाही यासंदर्भात निर्देश जारी केले आहेत.

<><><><><>

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत येत्या १ डिसेंबरला घेण्यात येणाऱ्या वरिष्ठ संशोधन अधिकारी, गट-अ आणि मराठी अनुवादक , गट-क या दोन संवर्गासाठी संगणक प्रणालीवर आधारित चाळणी परीक्षा होणार आहे. या परीक्षेच्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्र आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या

https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

<><><><><><>

**म**हानिर्मिती कंपनीनं "सहाय्यक अभियंता" आणि "कनिष्ठ अभियंता" पदांची रिक्त पदं सरळसेवा प्रवेशाद्वारे भरण्याकरता जाहिरात प्रसिद्ध केली आहे. यासाठी अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांना, महाराष्ट्र राज्याचं अधिवास प्रमाणपत्र बंधनकारक असल्याची अधिसूचना महानिर्मितीनं २१ नोव्हेंबर रोजी काढली आहे. त्याची प्रत महानिर्मितीच्या www.mahagenco.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. या **प**दांकरता अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख १७ डिसेंबर २०२२ आहे.

<><><><><><>

जागतिक नेत्यांच्या क्रमवारीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी पहिल्या स्थानावर कायम आहे. अमेरिकेतल्या मार्निंक कन्सल्ट या मानांकन संस्थेनं प्रसिद्ध केलेल्या जागतिक नेतृत्व मानांकनात मोदी सर्वात लोकप्रिय नेते ठरले आहेत. त्यांच्या पाठोपाठ मेक्सिकोचे अध्यक्ष अँड्रेस मॅन्युएल लोपेस ओब्राडोर दुसऱ्या, तर ऑस्ट्रलियाचे प्रधानमंत्री अँथनी अल्बानिस तिसऱ्या स्थानावर आहेत.

अमेरिकेचे अध्यक्ष ज्यो बायडेन नवव्या, तर युनाएटेड किंगडमचे प्रधानमंत्री ऋषी सुनक त्यांच्या मागं आहे. १६ ते २२ नोव्हेंबर या काळात संकलित केलेल्या माहितीच्या आधारे हे मानांकन दिलं आहे.

<><><><><><>

अवकाळी पावसानं **सिंधुदुर्ग** जिल्ह्यातल्या काही भागात आज दुपारी पावसानं हजेरी लावली. कुडाळ तालुक्यात ओरोस, कसाल, पणदूर, हुमरमळा, डिगस सहयाद्रीच्या काही भागात तसेच सावंतवाडी शहरासह आसपासच्या परिसरात जोरदार पाऊस झाला. या पावसाचा फटका आंबा, काजू मोहोराला बसण्याची शक्यता आहे.

**सातारा** जिल्ह्यातल्या विविध भागातही वातावरण ढगाळ असून आज संध्याकाळी काही भागात थोडा वेळ हलक्या स्वरूपाचा पाऊस पडला.

काल मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी हलका पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात कोकणात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता आहे. याच कालावधीत राज्यात इतरत्र हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

//<><><><><><>//